# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे - ४११००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पी.एच्.डी
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र.: ०२०-२५६९७३४१
२५६०११५३, २५६०११६०
फॅक्स क्र.: ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२७०७०६१

संदर्भ क्र. रा.से.यो/1107/११ दि. ३०/१२/२०११

प्रति,
मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी
रासेयो संलग्नित महाविद्यालये
पुणे जिल्हा.

विषय: ''राष्ट्रीय मतदार दिवस'' ( National Voters Day) दिनांक २५ जानेवारी २०१२ रोजी साजरा करणेबाबत.....

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, केंद्र शासन विधी व न्याय मंत्रालयाच्या वतीने पुणे जिल्हयातील रासेयो सर्व महाविद्यालयामध्ये दिनांक २५ जानेवारी २०१२ रोजी ''राष्ट्रीय मतदार दिवस'' (National Voters Day) साजरा करण्यात येत आहे. पुणे जिल्हयातील मतदारांमध्ये जागृती करण्यासाठी सर्व महाविद्यालयामधून दि. ०१ जाने. ते २५ जाने. २०१२ या कालावधीमध्ये विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, सायकल रॅली, मोटरसायकल रॅली, प्रभातफेरी, पथनाटय, प्रश्नमंजूषा, सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करावेत.

सर्व महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचा मोठयाप्रमाणात सहभाग असण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयामधील नेमलेल्या कार्यक्रम अधिकारी/नोडल ऑफीसरने संबंधीत माहिती त्वरीत जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे या कार्यालयामध्ये उपलब्ध करून दयावी. व जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक शाखेशी त्वरीत संपर्क साधावा.

संपर्कासाठी : (दूरध्वनी क्र. ०२०–२६१२२३४८)

कळावे,

आपली विश्वासू

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

Website : http://www.unipune.ac.in/nss
email : nss@unipune.ac.in